'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Vol. 3, Issue-4
ISSN : 2348-7143
Oct-Nov-Dec 2017

# जागतिकीकरण आणि सुनिल अवचार यांची कविता

सागर शे. गवई,
सहा. प्राध्यापक, मराठी विभाग,
स्व.भा.शिं.कला, प्रा.ना.गा.विज्ञान व आ.गा.वाणिज्य महाविद्यालय,
साखरखेर्डा, जि. बुलडाणा

गेल्या दोन दशकातील मराठी कवितेचे स्वरूप आजवरच्या मराठी कवितेपेक्षा आशय आणि तंत्राच्या अंगाने बदलले असल्याचे जाणवते. नव्वदच्या दशकापासून सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक स्थित्यंतरामुळे समाज मोठ्या प्रमाणात ढवळून निघाला. खुल्या आर्थिक धोरणाचा या सर्व घटकाबरोबरच सामान्य माणसाच्या जगण्यावरसुध्दा परिणाम झाला. जागतिकीकरणाने निर्माण केलेल्या नव्या जीवनशैलीमुळे माणसाचा माणसाकडे बघण्याचा दृष्टिकोण बदलला. परिणामतः माणूस पूर्णतः व्यवहारी बनून मानवी मूल्यांची घसरण होवू लागली. त्याच्या सामाजिक प्रगतीमध्ये बाधा येवून नव्या सामाजिक विषमतेने जन्म घेतला. त्यातून नवे 'ग्लोबलचे गावकूस' निर्माण झाले. त्यामध्ये सामान्य माणसाचे शोषणच झााले.

जागतिकीकरणाच्या अनुषंगाने येणारी सत्ताकांक्षा, न–नैतिक राजकारण, अराजकता, मुलतत्ववाद, मृत पावणाऱ्या भाषा व संस्कृती जन्माला आलेला नवमध्यमवर्ग, बदललेल्या नैतिकतेच्या संकल्पना, चंगळवाद, टोकदार झालेली जात आस्मिता व धर्मांधता, वाढती शस्त्रास्त्रे स्पर्धा, संवाद माध्यमांनी केलेले संमोहन, सांस्कृतिक संघर्ष, वाढता दहशतवाद हे सगळे प्रश्न जागतिकीकरणाने निर्माण झाले. वस्तुकेंद्री व बाजारकेंद्री व्यवस्थेमुळे सर्वसामान्य माणसाचे जगणे संभ्रमाचे होउन या काळातील वास्तव अन्य साहित्यप्रकाराच्या तुलनेने कवितेच्या माध्यमातुन जोरकसपणे व्यक्त झाले आहे.

सुनिल अभिमान अवचार यांच्या 'केंद्र हरवत चाललेल्या वर्तुळाचा परिघ' या काव्यसंग्रहातून समकालाचे यथोचित भान प्रकट झाले आहे. जागतिकीकरणाच्या धोरणाचे परिणाम सर्वच क्षेत्रावर होवून त्यामध्ये मानवी चेहरा हरविल्याची खंत सुनिल अवचार व्यक्त करतांना म्हणतात,

'पक्षी प्राणी फुले, फळझाडे नामशेषाच्या काठावर
हाडे, सापडे, फुटके कंदिल, हॅलोजन
शेतात पेरलेले सुरूंग, पसरत जाणारा वाळवंट
कुपोषित मुले – आया – भावंडे
एड्सग्रस्तांची वेश्या वस्ती सस्ती
माणसांचे कत्तलखाने / सैनिकांच्या शवपेट्या
उद्‌ध्वस्त करून गेलेले रणगाडे
उठून गेलेले गाव / दंगलीनंतरचे कहर
धुरात बुडालेले शहर / जखमांनी विव्हळणारे कृत्रे माणसे'

(गार्निका २०५०, पृ.क्र. ४९)

भोवतालचे असे भिषण वास्तव कवी चित्रीत करतात. खाउजाच्या धोरणाने दाखवलेल्या गोड गुलाबी स्वप्नामागील क्रुरवास्तव कवी येथे उलगडून दाखवितो या ग्लोबल वर्तमानात गेल्या दोन दशकात अमुलाग्र बदल

घडून आले. माहिती तंत्रज्ञानामुळे जग जवळ आले पण माणूस मात्र माणसापासून दुरावला. संवेदना बोथट झालेल्या मानवी संस्कृतीचे बाजारीकरण झाले. मानवी भावविश्वात झालेला हा बदल कवीने अचूकपणे टिपला आहे.

'या ग्लोबल वर्तमानात भावना झाली आहे जाहिरात
आणि मेंदूचे झाले आहे कम्प्युटर
तत्वज्ञान झाले आहे 'युज ॲण्ड थ्रो'
संस्कृती झाली आहे रखेल
या ग्लोबल वर्तमानात'

(ग्लोबल वर्तमान, पृ. क्र. २३)

जागतिकीरणाचा परिणाम म्हणून मानवी जाणिवेतील बदलामुळे मानवी भावनेची किंमत संपून मेंदु कम्प्युटरप्रमाणे वागताना दिसतो. तत्वज्ञान युज ॲण्ड थ्रो वाटू लागते आणि संस्कृती रखेल वाटते. कवी सुनिल अवचार यांनी सुक्ष्म निरीक्षणातून भोवतीचे हे वास्तव टिपले आहे. त्यामुळे सुनिल अवचार यांच्या कवितेसंदर्भात डॉ. अशोक पळवेकर म्हणतात. ''जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे निर्माण झालेल्या मानवी अस्तित्वाच्या कोंडीचे अत्यंत विस्तृत पटल सुनिलच्या कवितेने स्पष्टपणे उलगडून दाखवले आहे. या कवितेत दलित, शोषित पीडित, सर्वहारा, शेतकरी, शेतमजूर, कामगार, लघुउद्योजक, बेकार, स्त्रिया या सर्वांच्या जगण्याची वेदना व त्यांचे दु:ख खच्चून भरले आहे.''[१] कारण या कवितेच्या केंद्रस्थानी कॉमनमॅन असून त्यांच्या दु:ख वेदनेची मुळे उजागर करून शोषक महासत्तेविरूध्द संघर्षशील जीवनदृष्टी बहाल करणे ही सुनिल कवितेची भूमिका आहे. हा कॉमनमॅन सुनिल अवचारच्या कवितेत चहूकडे आहे,

'कॉमन मॅन
तासनतास उभा आहे लाईनमध्ये
कधी, सार्वजनिक संडासच्या दारासमोर
कधी लोकलच्या तिकिटासाठी
कधी, रेशनसाठी
कधी, जन्माच्या दाखल्यासाइी कचेरीत
कॉमनमॅन असतो/इतिहासाच्या ई—बुकात
अंतराळाच्या अंधुक दुनियेत / तिसऱ्या जगाच्या पृष्ठावर
वर्तमानाच्या सर्च इंजिनवर / ठण्ठण्ब्ण्च्या वार्तापत्रात सगळीकडे
पण तो नसतोच कधी राष्ट्रीय पक्षांच्या जाहिरनाम्यात'

(कॉमनमॅनची कविता, पृ. क्र. २७)

जागतिकीकरणाचा बळी ठरणाऱ्या कॉमनमॅनला आपल्या विचार व संवेदनकक्षेत घेणारी सुनिल अवचार यांची कविता असल्यामुळे 'कॉमनमॅन' चे सर्वकंष चित्रण त्यांच्या कवितेत येते. त्यातून ते समकालीन वास्तवाची कालसंहिता मांडतात. सर्वहारा समाजातील बेरोजगार तरूणाचे दाहक दु:ख मांडतांना सुनिल अवचार म्हणतात,

'माझ दु:ख समजून घेण्यासाठी कुठलाही स्पायडरमॅन येत नाही
अद्भूत हॅरी पॉटर आपल्या प्रश्नाविषयी बोलत नाही.
अमेरिकेचे यान आमच्या झोपडयांची हेरगिरी करत नाही.

ISSN : 2348-7143
Oct-Nov-Dec 2017

आणि ठण्ण्स्ण्चा गहू जगू ही देत नाही, मरूही देत नाही।

(ठण्ण्स्ण्चा गहू, पृ. क्र. ३७)

अशा प्रचंड दाहक वास्तवाची अनुभूती व्यक्त करणाऱ्या ओळी सुनिलच्या कवितेत येतात. अशा माणसांची घुसमट हा कवीच्या चिंतनाचा विषय आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत विविध कारणांनी होणारे मानवाचे अवमूल्यन हा त्यांच्या कवितेचा चिंतेचा आणि चिंतनाचा विषचा आहे. जागतिकीकरणात स्त्रिला वस्तुरूप प्राप्त झाले असून तिच्या शरीराबरोबरच भावनांचेही बाजारीकरणे झाले आहे. स्त्री म्हणजे जणू वस्तू असे ठासून सांगण्यात ही व्यवस्था यशस्वी झाली आहे. 'ती' ची विविध रूपे प्रकट करण्याचा व त्यातून 'ती' ला अगतिक बनविणाऱ्या व्यवस्थेचा खरा चेहरा समोर आणण्याचा कवी प्रयत्न करतो.

'ती मला भेटते / सुकलेल्या ओठांची
करपलेल्या त्वचेची / झिपऱ्या केसांची
मळकळ कुंबट वासाच्या कपडयांतील / मनगटाने शेंबुड पुसणारी
माळरानात कापूस वेचणारी / फळे विकणारी / तिफणीमागे चालणारी
खातावरचे कागद धुंडणारी / साक्षरतेच्या शाळेत कंदिलाच्या अंधूक उजेडात
मुळाक्षर गिरवणारी / सोयरीकीसाठी आलेल्या पाहूण्यांपुढे
खालच्या नजरेने पाहणारी / रोजगार हमीच्या यादीतील एक मजूर
एक मोलकरीण..... / संस्कृतीचा बुरखा घालून
जातीव्यवस्थेच्या जात्यात भरडलेली

(ती मला भेटली, पृ. क्र. ५७)

अशी आधुनिक स्त्रिची विविध रूप कवी शोधण्याचा प्रयत्न करतो. आणि शेवटी 'ती म्हणजे खुप काही/ ती काही हातात लागत नाही' असे म्हणतो. स्त्रियांच्या समकालीन वास्तवाचे भान कवी जोपासतो.

एक भाषा, एक संस्कृती, एक जीवनशैली, एक कला, एक साहित्य एक मूल्य आणि एक सत्ता यांचा पुरस्कार करणाऱ्या या ग्लोबलच्या गावकुसात ग्लोबल संस्कृतीच्या नावाखाली संस्कृतीचे विकृतीकरण होत असल्याने कवी उपरोधाने म्हणतो,

'जाड भाकरी ऐवजी – बीवबवसंजम इंत
साध्या पाण्याऐवजी – इपेसमतपए ुनेहंनतक
फाटक्या झोपडीसाठी – ेपत बवदकपजपवद ेलेजमउ
मग्रुर अंधारात – ेिसवहमद
अरूंद रस्त्यावर फिरण्यासाठी
एअर इंडियाचे पास, देशीवाद्यांसाठी व्हिसा
पर्यावरणवाद्यासाठी अरण्य, अंधश्रध्देसाठी नासा
जगण्यास वर्ग – वर्णाची विकृती
या शतकातील ही ग्लोबल संस्कृती

(ग्लोबल संस्कृती, पृ. क्र. ३८)

आधुनिकीकरणाच्या नावाखाली शोषणाची नवी प्रक्रिया जन्माला घातल्या गेली. तिसऱ्या जगाच्या शोषणावर विकसीत देशांची वाटचाल सुरू आहे. या तिसऱ्या जगातील जिवघेण्या वास्तवाचा शोध घेणारा हा

ISSN : 2348-7143
Oct-Nov-Dec 2017

चिंतनशील कवी दलित, शोषित, पीडीत, स्त्रीया व आदिवासी यांची अगतिकता फोफावलेला भ्रष्टाचार, वाढलेली जातीयता, अत्याचार, धर्मांधता, अंधश्रध्दा, शेतकरी आत्महत्येचं सत्र यांचे भयावह रूप मांडून वाचकांना अस्वस्थ करतो. पण सुनिल अवचार यांची कविता निराशावादी नक्कीच नाही तर रात्रीच्या गर्भात दडलेल्या उष:कालाचे सूचन करणारी क्रांतीगर्भ जाणिवेची कविता आहे. ती शोषण परंपरेला नकार देत समतेची मानवतेची आस बाळगून विश्वकल्याणाचा आशावादी सूर आळविते. संस्कृतीचे होत असलेले अमेरिकेनायझेशन तिसऱ्या जगाच्या विनाशाला कारणीभूत आहे.

'अरे ! वेडयांनो
संस्कृतीचे अमेरिकीनायझेशन झाले आहे. जगण्यातला वर्ण
कायम ठेउन
चंगळवादी थैमान घालत आहे. आपल्या मानगुटीवर घिरटया
आम्ही झालो आहोत त्यांच्या वस्तूंचे ग्राहक.....
कसे शोधू आम्ही या बाजारात आजच्या जीवनाचे सत्व
आमच्या जगण्याचीच हाउसफूल कॉमेडी झाली आहे.

(संस्कृतीचे अमेरिकीनायझेशन, पृ. क्र. १९०)

चंगळवाद, दहशतवाद धर्मांधता व मुलतत्ववादामुळे मानवी अस्तित्व धोक्यात आले आहे. सुनिल अवचार यांच्या कवितेबद्दल डॉ. मनोहर जाधव म्हणतात, ''या कवितासंग्रहात भयचकीत करणारे आणि बदलत जाणारे सभोवतालचे भिषण वास्तव कवीने अतिशय संवेदनशीलपणे अधोरेखीत केलेले आहे. सुक्ष्मनिरीक्षण आणि वस्तुनिष्ठ आकलनाद्वारे आपल्या सामर्थ्यशाली अभिव्यक्तीचा प्रभावी उद्गार म्हणजे अवचार यांची कविता आहे.''[२] हे सुक्ष्म निरीक्षण व वस्तुनिष्ठ आकलन सुनिल अवचार यांच्या 'मुंबईची धारावी' या कवितेतही अधिक प्रकर्षाने जाणवते.

'ही नेत्याच्या खिशातली । ही गुंडाच्या तावडीतली
ही मृत्यूची वाट पाहत असणाऱ्यांची
ही सवर्णांची तुच्छतेची । ही तुंबलेल्या गटारांची
ही थकलेल्या खांद्यांची । खाली दुकान उपर मकान धारावी
गरिबाचा ताजमहल धारावी, इबादतची जागाही धारावी,
धारावी रियालिटी टूरिझम । प्रारंभ माहिम ते शेवट कुंभारवाडा
येतात लोक जर्मनी, आस्ट्रिया, कॅनडातून वगैरे वगैरे । सैलानी म्हणून
घेतात गरिबाचा जायका । गरिबांच्या चेहऱ्याचा मोठा बाजार
हे सैलांनी पाहून म्हणतात । गरिबी पाहून अश्रु येतात
मी तसा नाही थँक गॉड।

(मुंबईची धारावी प्र.क्र. ३५५, ३५६)

आणि शेवटी कवी –

धारावीच्या माणसाचे हृदय चिमुटभर नाही । ते आहे सुपाएवढे
येथे स्लमडॉग राहतात तुम्हावर ते भुंकणार नाहीत !

(मुंबईची धारावी प्र.क्र. ३५७)

असे मेंदु सुन्न करून हृदय अस्वस्थ करणारे सुक्ष्म निरीक्षण कवी नोंदवतो. तेव्हा कोणत्या जीवन वास्तवात आपण जगतो आहे असा प्रश्न पडतो. यावरून सुनिल अवचार याचे समकालीन जीवन वास्तवासंबंधीचे भान किती तिव्र आणि थेट आहे याची प्रचिती येते. त्याच्या सारख्या कवितेतून नैसर्गिक साधन संपत्तीवरील क्रुर आक्रमणाची जाणीव प्रभावीपणे मांडली आहे. नागनाथ वळते सुनिल अवचार यांच्या कवितेला 'मॉडर्न हिस्ट्रीची ब्लू प्रिंट'[3] म्हणतात. तर बी. रंगराव ''ही कविता समकालीन वास्तवाचे स्वतः च्या वेगवेगळेपणाचे भान असणारी उत्तर आधुनिक अभिव्यक्ती आहे तिचे रूप व आकार छंदबध्द नाही, तिला अलंकाराचा बाज नाही किंवा प्रतिमा प्रतिकाचा बडेजावपणा नाही. वास्तवाचे उपहासात्मक संदर्भ तिला सद्यस्थितीचा प्रतिबिंब ठरवतात.''[४] तर डॉ विवेक खरे, 'समकालाची क्रुर पिडा व्यक्त करणारी ही कविता आहे'[५] असे निरीक्षण नोंदवतात. समकालीन वास्तवाचा वेध घेताना सुनिल अवचार यांच्या कवितेने वापरलेली भाषीक रूपे महत्वपूर्ण आहे.

डॉ. विवेक खरे,''नामदेव ढसाळ, भुजंग मेश्राम, अरूण काळे यांच्या नंतर भाषिक अभिव्यक्ती आपल्या कवितेतून सशक्तपण वापरणार कवी म्हणून अवचार यांचा उल्लेख करावा लागेल''६ असे म्हणतात. अर्थात विज्ञान तंत्रज्ञानाशी निगडीत भाषिक रूपे वापरण्यामागे कवीची निश्चित भूमिका दिसते.

तात्पर्य, जागतिकीकरणामुळे समकालीन जीवनव्यवहारात जाणवू लागलेली पडझड, सामाजिक सांस्कृतिक राजकीय जीवन व्यवहारातील विसंगती व मूल्यव्यवहारातील घुसळणीचे दाहक वास्तव वर्तमानाच्या भाषेत प्रकट करणारी सुनिल अवचार यांची कविता आहे.

**निष्कर्षः—**

१. जागतिकीकरण हे केवळ आर्थिक सामाजिक राजकीय व सांस्कृतिक घटकावरच परिणाम करणारे नसून पर्यावरणालाही उध्दस्त करणारे आहे याचे भान सुनिल अवचार यांच्या कवितेतून येते.
२. या कवितेतून भूतकाळ आणि वर्तमानासोबतच भविष्यकाळाचा वेध घेता येतो.
३. सुनिल अवचार यांची कविता मानवतावादी, वैश्विक करूणेबरोबरच विद्रोहाचा सूर आळविते.
४. समकालीन समाज वास्तवाला उजागर करीत नव्या युगजाणिवाची मांडणी करणारी ही कविता आहे.
५. शोषणविरोधी तत्वज्ञानाची जीवनदृष्टी देणारी सुनिलची कविता आहे.
६. कॉमनमॅनच्या दुःख वेदनेची मुळे ही कविता उजागर करते.
७. या कवितेने जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे निर्माण झालेल्या मानवी अस्तिावाच्या कोंडीचे विस्तृत पटल उलगडून दाखविले आहे.
८. जागतिकीकरणामुळे निर्माण झालेले अस्तित्वाचे प्रश्न, बाजारप्रवृत्ती, चंगलळवाद, मुलतत्ववाद, धर्मांधता, पोटार्थीवृत्ती व अंधश्रध्दा यांना ही कविता विरोध दर्शविते.
९. सुनिल अवचार यांची कविता स्त्रीयांची विविध रूपे साकार करून स्त्रीला जागतिकीकरणामध्ये प्राप्त झालेल्या वस्तुरूपाला विरोध दर्शविते.

**संदर्भ :—**

१. पळवेकर अशोक, प्राककथन,'केंद्र हरवत चाललेल्या वर्तुळाचा परिघ' निर्मिती संवाद प्रकाशन, कोल्हापूर प्र. आ. जाने. २०१६ पृ. क्र. १७

२. जाधव मनोहर, प्रतिक्रिया, 'केंद्र हरवत चाललेल्या वर्तळाचा परिघ, निर्मिती संवाद प्रकाशन कोल्हापूर, प्रा. आ. जाने २०१६, पृ. क्र. ३६५
३. रंगराव बी., 'आकलन' त्रैमासिक' जाने—फेब्रु— मार्च, २०१७, पृ. क्र. ३९
४. वळते नागनाथ, 'पुस्तकांच्या जगात' दै. लोकमत
५. डॉ. विवेक खरे, 'दै. प्रहार, मुंबई, दि. ०१ जाने, २०१७
६. तत्रैव.